**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**कस्तुरबा रुग्णालय**
क्र.एचओ / 1174 / केएच दि. 13.05.2026

**जाहिरात**

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्रमांक एमजीसी/एफ/6962 दि. 26.06.2025 नुसार कस्तुरबा रुग्णालयाकरिता खालील नमूद करण्यात आलेले पद निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. सदर पदाकरीता बृहन्मुंबईमहानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.inया संकेतस्थळावर प्रस्तुत जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

कंत्राट कालावधी - दि. 01.10.2025 ते 31.03.2027
(कंत्राटी तत्वावर दर 179 दिवसांची 1 दिवसाचा तांत्रिक खंड )

| **अनु. क्र.** | **पदाचे नाव** | **एकूण पदे** | **ठोक मानधन (प्रति माह)** | **शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|---|---|
| 1 | नोंदणी सहाय्यक (Registration Assistant) | 3 | 18,000 | 1) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक (SSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा. आणि<br>2) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा.<br>3) उमेदवाराला संगणकातील ऑपरेंटींग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफटवेअर, ई- मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्त्म ज्ञान असावे. |

**महत्त्वाच्या सूचनाः**

तसेच वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांकडे तक्त्यामध्ये त्यांच्या पदांसमोर नमुद केलेल्या संबंधित अर्हते व्यतिरिक्त खालील अतिरिक्त अर्हता असणे निवडीसाठी अनिर्वाय आहे.

1. उमेदवार मान्यता प्राप्त मंडळाची माध्यमिक व उच्च शालांत प्रमाणप्रत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा आणि 100 गुणांचा मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन

उत्तीर्ण झालेला असावा. तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा लिहिता वाचता येणे आवश्यक आहे.

2. उमेदवार 'डी ओई एसी सी' सोसायटीचे 'सी सी सी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' 'बी स्तर किंवा 'सी स्तर' प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्राच्या उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी ई सी टी' चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.
3. कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
4. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजीतून सहजपणे संभाषण करता येणे व स्पष्ट ऐकू येणे आवश्यक आहे.
5. नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु 500 /- बॉड पेपरवर करारनामा करुन घेण्यात येईल.
6. उमेदवार रोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल, त्यांची विनापरवानगी गैरहजरी (LWP) करण्यात येईल.
7. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
8. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 1 महीना आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांचे शेवटचे वेतन अधिदान करण्यात येणार नाही.
9. नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपा मध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
10. उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
11. निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
12. प्रशासकीय किवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. वैद्यकीय अधिक्षक, कस्तुरबा रुग्णालय यांना आहेत.

**विशेष सुचनाः**

1. अर्जाचे विहित मूल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
3. टपालने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**वयोमर्यादाः उमेदवाराचे वय 18 वर्षा पेक्षा कमी व 38 वर्षा पेक्षा जास्त असता कामा नये.**

**निवडीचे निकष व कार्यपध्दतीः**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
2. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ - अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी नंबरवर आधी कळविण्यात येईल.
3. अर्ज करण्याचा कालावधी - दि. 15.05.2026ते दि. 22.05.2026(कार्यालयीन वेळेत)
4. अर्जाचे शुल्क - रुपये 790 + 18% GST आहे. सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
5. अर्जाचे शुल्क भरण्याचा कालावधी - 15.05.2026ते दि. 22.05.2026(कार्यालयीन वेळेत)

**सर्वसाधारणअटीः**

1. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) सुस्पष्ट व पुर्ण असावा. सुस्पष्ट नसल्यास जर संपर्क साधता आला नाही तर कार्यालय जवाबदार नसेल
2. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या ठोक मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
3. महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
4. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्या बाबत माहिती देणे आवश्यक आहे.
5. त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 179 दिवसानंतर एक दिवसाचा सेवाखंड देण्यात येईल.

6. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा तसेच परिपत्रक क्र. संचालक/वै.शि.प्र.रु/ 3644 दि. 14.10.2023 अनुसार 6 महिन्यांकरिता समप्रमाणात एकूण 7 ½ दिवस नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील, त्याव्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल.
7. उमेदवारांना रुग्णालय प्रशासंनानी नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त आपत्कालीन परिस्थितीमध्ये सेवा देणे बंधनकारक असेल.
8. कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयात कर्तव्य बजावताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल तसेच न्यायवैद्यकीय (Medico Legal) जबाबदारी घ्यावी लागेल.
9. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा. वैद्यकीय अधिक्षक, कस्तुरबा रुग्णालय यांच्याकडे राहील.
10. उमेदवाराची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

सही /-
वैद्यकीय अधिक्षक (प्र.)
कस्तुरबा रुग्णालय